

ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १८ वा ❑ भारतीय सौर दिनांक ३० माघ शके १९४७, गुरूवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

मंत्रालय दलालांचा अड्डा बनतंय...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

मंत्रालयातील मध्यस्थांची साखळी तोडण्यासाठी सरकारने डिजिटल इंडियाच्या माध्यमातून ऑनलाईन सेवा आणि थेट संवाद वाढवण्यावर भर दिला आहे . मंत्रालय सुधार अहवाल द्वारे ई-फाईल निर्मिती आणि पारदर्शकता वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत तरी देखील मंत्रालयात मध्यस्थांमार्फत कार्य होत असल्याने सरकारच्या पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण होत आहे.

अलिकडच्या काही घटनांमुळे मंत्रालयातील पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण होत आहे. सध्या मंत्रालयातील कथित घोटाळ्याचा प्रश्नाची महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू आहे. मंत्रालयातील कथित दलाली आणि भ्रष्टाचाराबाबतची सद्यस्थिती चिंताजनक आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांच्या कार्यालयातील एका लिपिकाला मंत्रालयातच ३५,००० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले या लिपिकाकडे मंत्रालयात प्रवेशासाठी असलेल्या १०,००० रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त (अतिरिक्त ४२,००० रुपये) रोख रक्कम आढळली, ज्यामुळे सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.संबंधित मंत्री नरहरी झिरवाळ यांनी स्पष्ट केले आहे की, त्यांचा या प्रकरणाशी संबंध नाही आणि जर कोणताही पुरावा आढळला तर ते पदाचा राजीनामा देण्यास तयार आहेत.मात्र ते सध्या संशयाच्या भोवऱ्यात अडकले असून विरोधी पक्षांनी काँग्रेस आणि शिवसेना यांसारख्या विरोधी पक्षांनी मंत्रालयाला भ्रष्टाचाराचा अड्डा संबोधून सरकारवर टीका केली आहे एका सहीसाठी किंवा फाईल पुढे नेण्यासाठी उघडपणे पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारींमुळे मंत्रालयाची प्रतिमा मलिन होत असल्याचे मत काही माध्यम संस्थांनी व्यक्त केले आहे.

मंत्रालयातील भ्रष्टाचारचा मुद्दा ऐरणीवर असतानाच आता अजित दादांच्या मृत्यूच्या दिवशीच ७५.शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.अजित पवारांचं २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झालं. संपूर्ण महाराष्ट्र या घटनेमुळे शोकाकुल झाला. दरम्यान अजित पवारांच्या निधनाच्या दिवशीच.अल्पसंख्याक संस्थांना प्रमाणपत्र देण्याचा घाट घालण्यात आला.

अजितदादांनी थांबवून ठेवलेल्या काही फाइल्सवर अजित दादांच्या अपघाताच्या दिवशीच दुपारी चार वाजता सह्या करण्यात आल्या आणि ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जाचं प्रमाणपत्र वाटप करण्यात आलं.

अल्पसंखअयाक विकास विभागाकडून अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देणं अपेक्षित होतं मात्र त्यांच्या परस्पर मंत्रालयातील मुजोर अधिकाऱ्यांनी ही मंजुरी दिली. विशेष बाब म्हणजे १२ ऑक्टोबर २०२५ ला माणिकराव कोकाटेंनी या प्रमाणपत्र वाटपाला स्थगिती दिली होती. कोकाटेंना मंत्रिपद सोडावं लागल्यानंतर हा विभाग अजित पवारांकडे होता.

अजित दादांच्या निधनानंतर अवघ्या काही तासांतच मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी हा प्रताप केल्याचं समोर आलंय. विशेष म्हणजे अनेक प्रमाणपत्रे शासकीय वेळ संपल्यानंतर संध्याकाळी ६.४५ते ६.५८ दरम्यानची आहेत.

७५ पैकी २५ शाळा पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या आहेत. २९ जानेवारीला एकाच दिवशी त्यांना मान्यता देण्यात आली.

तर सेंट झेवियर्सच्या ५ शाळांनाही अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला.

स्वामी शांती प्रकाश व देवप्रकाश संस्थांच्या ४ शाळांनाही अशीच प्रमाणपत्रं देण्यात आली आहेत. या घाई-घाईच्या प्रक्रियेमागे मोठ्या आर्थिक गैरव्यवहार असू शकतो.

अजितदादांच्या निधनाच्या दिवशी सह्या करण्यात आल्या आणि शाळांना अल्पसंख्याक दर्जाची प्रमाणपत्रं देण्यात आली हे नेमकं कोणाच्या इशाऱ्यावर केलं, याचा खुलासा कधी होऊ शकेल का?

ही बातमी वाऱ्यासारखी पसरतात राज्यात मोठा भूकंप निर्माण झाला.लगेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाला स्थगिती देण्याची घोषणा केली व पुढील चौकशीचे आदेश दिले.

मंत्रालयात जो काही गंभीर प्रकार चालत आहे त्याला आळा घालण्यासाठी सरकार कोणते पाऊल उचलणार,याकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार आणखी काही कडक नियम किंवा डिजिटल उपाययोजना जाहीर करण्याची शक्यता आहे का?

श्रीनिवास कुलकर्णी यांना विंदा करंदीकर जीवनगौरव, तर भालचंद्र नेमाडेंना साहित्यभूषण पुरस्कार

साहित्य क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल गौरव

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई : साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना २०२५ चा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, तर ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांना २०२५ चा साहित्यभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. साहित्य क्षेत्रातील महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी मंत्रालयात केली.





विंदा करंदीकर जीवनगौरव आणि साहित्यभूषण या दोन्ही पुरस्कारांचे स्वरुप दहा लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे आहे. प्रकाशन संस्थेसाठी दिल्या जाणाऱ्या श्री. पु. भागवत पुरस्काराचे स्वरुप पाच लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्हअसे आहे, तर भाषा अभ्यासक आणि भाषा संवर्धक पुरस्कारांचे स्वरुप प्रत्येकी दोन लाख रुपये व सन्मानचिन्ह असे आहे.

प्रकाशन संस्थेसाठी दिला जाणारा श्री. पु. भागवत पुरस्कार-२०२५ नांदेड येथील निर्मल प्रकाशनला जाहीर झाला.

डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ. दिलीप धोंडगे आणि इचलकरंजी येथील आपटे वाचन मंदिर यांना घोषित करण्यात आला.

कविवर्य मंगेश पाडगावकर भाषा संवर्धक पुरस्कार-२०२५ विनोद कुलकर्णी आणि कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेला जाहीर झाला आहे.

नाशिक येथे २६ फेब्रुवारी ते १ मार्च असे चार दिवस चौथे विश्व मराठी संमेलन आयोजित केले जाणार आहे. या संमेलनात या पुरस्कारांसह यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांचेही वितरण केले जाणार आहे. विश्व मराठी संमेलनात दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणाही यावेळी करण्यात आली. यात कलारत्न पुरस्कार संगीतकार अजय-अतुल गोगावले, विश्व मराठी संमेलन विशेष पुरस्कार शांतीब्रह्म गुरुवर्य मारुती कुरेकर यांना जाहीर झाला.

वाचनालये साहित्य-संवादाची केन्द्रे व्हावीत

ज्योतिर्मय साहित्य

गेल्या काही वर्षात मोबाईल, दूरचित्रवाणी, संगणक, त्यावरील गेम, अशा साधनांचे वाढलेल्या वापरामुळे वाचनाचा वेळ फार मोठ्या प्रमाणात विभागला गेला. हे सत्य नाकारुन चालणार नाही. मोबाईलवर फेसबुक, वॉट्साप, युट्युब, मध्ये जास्त वेळ खर्च होत असल्याचे आपले निदर्शनास येते.ई-बुक वाचणारा वर्ग आहे, पण तसा तो जास्त नाही.सिमितच आहे. त्यामुळे साधारणपणे १६ते ३०/३५ ह्या वयोगटातील वाचनाची आवड तशी कमी झाल्याचेच दिसून येते. काही वर्षापूर्वी नॅशनल बुक ट्रस्टच्या सर्व्हे क्षणात ४६ लाख युवकात फक्त ९ लाख युवकच वाचन करत असल्याचे निदर्शनास आले होते.आता तर त्या परिस्थितीत अजूनही बदल झाला असावा.

''वाचन संस्कृती''चा विषय चर्चेत आल्या नंतर अनेक प्रश्न डोळ्यासमोर उभे रहातात. मग हल्ली एकूणच वाचनाची आवड कमी झालीय का? नसेल तर कुठल्या प्रकारचे वाचन होतेय? कुठल्या माध्यमातून होतेय? म्हणजे वाचनात कुठल्या माध्यमाचा वापर जास्ती होतोय. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, सर्वसाधारण पुरुष व महिला वाचक, पन्नासचे आतील त्यावरील असे भाग करता येतील. ते काय वाचता.? कथा, कादंबऱ्या,कविता, चरित्र,आत्मचरित्र,ललित, विज्ञान विषयक,ऐतिहासिक, संत साहित्य,प्रवास वर्णन,बाल साहित्य,मासिके, दिवाळी अंक,वर्तमानपत्र, अशा अनेकविध प्रकारचा विचार त्यात येतो.

वाचनसमृध्दी साठी अनेकविध प्रकारे, वेगवेगळ्या पातळीवरील प्रयत्न केले जातात.सर्व्हे क्षण केले जाते,व योजनांची आखणी केली जाते.ग्रंथालयांना अनुदानही दिले जाते. अनेक ग्रंथालये सक्षम आहेत.स्वतःची ईमारत आहे. मंगलकार्यालये आहेत.व्यापारी संकुल आहेत.परंतु वाचनालयांचे कार्यकारी मंडळाचे निष्क्रीयते मुळे,मुळातच त्यांना वाचन,साहित्य विषयी गोडी नसल्यामुळे अशी ग्रंथालय ही साहित्यिक अड्डे होउ शकली नाहीत. राजकारणाचा शिरकाव होऊन राजकीय अड्डे मात्र झाली आहेत. वाचनालयाच्या निवडणुका समोर ठेवून कोणाला कोणत्या प्रकारचे सभासदत्व द्यायचे ईथ पासून निर्णय घेतले जातात.ही शोकांतिका आहे.

खरं तर आज प्रत्येक तालुका आणि जवळपास ७० ते ८० टक्के ग्रामीण भागात ग्रंथालये आहेत.त्यांना ग्रामविकास निधीतून सहाय्य मिळत असते. पण त्याचा फायदा घेतला जात नाही.ग्रामीण भागात तर वाचनाची फारच दुरावस्था आहे. अनेक ग्रंथालयात पुस्तके पडून आहेत.कारण ती ग्रंथालय बंदच असतात.ज्याच्या कडे काम सोपावले असते तेच उदासीन असतात. वेळ मिळेल तेव्हा उघडतात.त्यामुळेच वाचकांना पर्यंत पुस्तके पोहचत नाहीत.

अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे वाचनालया मध्ये महिलांचा सहभाग फार कमी आहे. अतिशय तुरळक प्रमाणात महिला वाचनालयाच्या सभासद असतात. दररोज जसे पुरुष काही प्रमाणात मुले वाचनालयात येऊन वर्तमानपत्राचे वाचन करतात तसे अद्याप महिलांच्या बाबतीत दिसत नाही त्यासाठी वाचनालयामध्ये महिलांसाठी वेगळा वाचन कक्ष असणे अतिशय महत्त्वाचे आहे.लहान मुलांसाठी बाल विभाग असायला हवा. संस्कार त्यांच्या मनावर रुजतील अशी पुस्तके उपलब्ध करून द्यायला हवीत.

तसेच वाचनालयाच्या कार्यकारी मंडळात महिलांचा समावेश जवळपास नसतोच म्हटले तरी चालेल त्या ठिकाणी महिलांचा सहभाग आवश्यक आहे. किंवा महिलांसाठी महिलांनी चाललेले वाचनालय आहे अद्याप कुठे दिसत नाही अशा प्रकारे महिला वाचनालय निघाल्यास महिलांचा सहभाग वाचनात वाढेल असे म्हणायला हरकत नाही. तेव्हा जर कुठे असा प्रयत्न महिला करतील तर अशा वाचनाला सरकारकडून चालना दिली गेली पाहिजे व अनुदानही दिले गेले पाहिजे.

वाचनालयामध्ये पुस्तकांची विगतवारी केलेले रजिस्टर असतात, जसे कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेख, धार्मिक, ऐतिहासिक, परंतु एखादा चोखंदळ वाचक जर त्याप्रमाणे मागणी करू लागला तर त्यातही टाळाटाळ केली जाते. पुस्तक गेलेले आहेत असे सांगण्यात येते. समोर पडलेल्या पुस्तकाच्या ढेऱ्यातूनच वाचकांनी पुस्तक निवडावे अशी ग्रंथपालाची भावना असते. जेणेकरून त्रास कमी होईल. अर्थात अशी परिस्थिती सर्वदूर असते असे नाही पण ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी वाचनालय मंडळांनी लक्ष पुरवणे आवश्यक आहे.

शाळां कॉलेजेस मधून पुस्तकी ज्ञाना सोबतच विद्यार्थ्यांना ईतर वाचनाची गोडी निर्माण करायला हवी.चरित्रे, आत्मचरित्रे, विज्ञान, आणि अनेक प्रेरणादायी पुस्तकांची ओळख करुन द्यायला हवी. शाळा महाविद्यालयातही पुस्तक प्रदर्शन भरवली पाहिजेत. साहित्यिकांची ओळख, त्याच्याशी संवाद,कार्यक्रम आयोजनातून विद्यार्थ्यांची आवड वृद्धिंगत करायला हवी.वेळोवेळी विद्यार्थ्यांना कुठली पुस्तके वाचावीत ह्याच मार्गदर्शन करायला हवे.तरच हे शक्य आहे. खूप साऱ्या पुस्तकांनी ही वाचनालय समृद्ध असतात. वाचाल तर वाचाल,वाचनाने मन समृध्द होते,पुस्तका सारखा मित्र नाही,दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडित वाचित जावे.असे वाचनाची महती सांगणारी वाक्ये लावलेली दिसतात.त्याकडे कधी पाहिले जात नाही.

एकुणच विद्यार्थ्यांचा वाचनाचा कल कमी झाल्याचे जाणवते.

आज शहरी भागात जसे नासिकला कुसुमाग्रज प्रतिष्ठान, सा.वा. नासिक, ग्रंथ तुमच्या दारी, पुण्यात-पुस्तक पेठ, अक्षरधारा, म.सा.प. राजहंस प्रकाशन, मेहेता प्रकाशन, मुंबईत-ग्रंथाली, मराठी ग्रंथ संग्रहालय,जळगांवला-व. वा.वाचनालय ठाणे, नागपूर, अकोला, सांगली. कोल्हापूर, संभाजी नगर आणि ब-याच जिल्ह्याचे ठिकाणी साहित्यिक कार्यक्रमाची केंद्र आहेत. तिथे पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक कार्यक्रम नेहमी होत असतात. बदलापुरचे ५००० सभासद असलेले ''ग्रंथसखा'' वाचनालय एक उत्तम उदाहरण आहे.डोंबिवलीत पै फ्रेन्ड वाचनालय आहे.

काही शहरात, जसे ठाणे, पुणे, डोंबिवली, येथे वाचनालयालयाच्या वतीने पुस्तक आदान प्रदान कार्यक्रम राबवला जातो. आपल्या जवळचे पुस्तक तिथे देऊन आपण न वाचलेले पुस्तक घेणे. अशा कार्यक्रमातही वाचकाचा फार मोठ्या प्रमाणात सहभाग असतो पण असे कार्यक्रम ठराविक ठिकाणीच होतात ते अनेक वाचनालयातून राबविले जावेत. त्यासाठी वाचनालयाचे कार्यकारी मंडळ उत्सुक असावे व त्यांना साहित्य विषयक गोडी असावी हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

आजही तालुका पातळीवर पुस्तकाची अशी दुकान जवळपास नाहीतच. माझ्या तरी पहाण्यात नाही. क्वचित अपवाद असावा. त्यामुळेच वाचकापर्यंत पुस्तके पोहचत नाही.ग्रंथालय आहेत, पण प्रत्येक ठिकाणची परिस्थिती त्या त्या ठिकाणच्या कार्यकारी मंडळाचे आवडी निवडीवर अवलंबून असते.

(क्रमशः)